सोमवार दि.३१ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता
बीड


मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत     संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९६ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राजे लखोजीराव जाधव साहित्य नगरी मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे आज साहित्यीकांची मांदियाळी





जिजाऊंचे जन्मस्थान असलेला राजवाडा मातृतीर्थ सिंदखेड राजा



जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर लोणार



राजे लखोजिराव जाधव यांची समाधी असलेले भुमट मातृतीर्थ सिंदखेड राजा



मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील रामेश्वर मंदिर



निळकंठेश्वर बारव मातृतिर्थ सिंदखेड राजा

## मातोश्री मंगल कार्यालय येथे संपन्न होणार पहिले बहुजन साहित्य संमेलन २०२५

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । प्रतिनिधी

बहुजन साहित्य संघाच्या ३१ मार्च, २०२५ रोजी मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे नियोजित असलेले सहावे राज्यस्तरीय साहित्य संमेलन आज संमेलनाध्यक्ष मा. डॉ. गणेश गायकवाड सुप्रसिद्ध गझलकार, उद्घाटक मा. खा. प्रतापराव जाधव केंद्रीय मंत्री आयुष्य मंत्रालय, प्रमुख अतिथी मा.आमदार, मनोजभाऊ नंदाताई देवानंद कायंदे सिंदखेड राजा, मा.आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील चिखली, मा.आमदार सिद्धार्थ खरात मेहेकर, मा. डी. एन. जाधव झेप संपादक छत्रपती संभाजी नगर, मा. डॉ. मिलिंद दहिवले राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय मानवाधिकार संघटन नई दिल्ली, मा. प्रा. संजय खडसे उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा, स्वागताध्यक्ष मा. प्रा. डॉ. संघर्ष सावळे स्कॉस्टलंड यार्ड स्टूडंटस् ब्रँड ॲम्बॅसेटर, छत्रपती संभाजी नगर आणि राज्यातिल साहितिक यांच्या समवेत मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील मातोश्री मंगल कार्यालय येथे संपन्न होत असून मातृतिर्थ सिंदखेड राजा नगरी खऱ्या अर्थाने विकासापासून वंचित असल्या कारणाने महाराष्ट्रातील सूज्ञ साहित्यिकांच्या व विचारवंतांच्या नजरेस ही वस्तुस्थितीआणून देणे व शासनाचे या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करणे यासाठी होत असलेल्या ब. सा. संघाच्या प्रस्तावित साहित्य संमेलनाची रूपरेषा व उद्दिष्ट त्यांच्यासमोर ब. सा. संघाचे अध्यक्ष ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे चिखली व लोकनेता चे संपादक तथा ब. सा. संघाचे संयोजक ज्ञानेश्वर बुधवत यांनी विषद केली.

आज संपन्न होत असलेल्या बहुजन साहित्य संघाच्या दि. ३१ मार्च, २०२५ च्या नियोजित, मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरी येथे संपन्न होऊ घातलेल्या राज्यस्तरीय सहाव्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विचारात असलेले मातृतिर्थ बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाचे प्रस्तावित मुद्दे पुढीलप्रमाणे.....

१) बहुजन साहित्य संघाचे साहीत्य संमेलन २०२५ मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे संपन्न व्हावे.

२) या साहित्य संमेलनात महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील मान्यवर साहित्यिक मंडळी, लेखक, कवी इत्यादींचा समावेश असावा.

३) या संमेलनासाठी परीसरातील नागरीकांसोबतच स्थानिक शासन प्रशासनाचा सुद्धा सहभाग असावा.

४) संमेलनाच्या पूर्वतयारी व संपन्नतेसाठी साहित्यिक व कार्यकत्यांची संमिती किंवा मंडळ असावे.

५) या संमेलना मध्ये वृत्तपत्रिय व वृत्तवाहीनी क्षेत्रामधील संपादक, पत्रकार, इत्यादी सर्व मान्यवरांचा सहभाग असावा.

६) या संमेलनासाठी सामिजिक, शैक्षणिक, सांकृतिक, क्रिडा तसेच राजकिय क्षेत्रातील मान्यवरांचे निस्पृह सहकार्य असावे.

७) या संमेलनाच्या निमित्ताने प्रस्तापितांच्या बरोबरच नवोदित लेखक, कवी, व साहित्यिकांना संधी मिळावी.

८) संमेलनातून मातुतीर्थ जिल्हाच्या सर्वांगीण विकासाच्या मुद्यांवर चर्चा व्हावी / परीसवांद व्हावा.

९) नागरीकांच्या मानवाधिकारांची तसेच संविधानाद्वारे मिळालेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्ये यांची ओळख नागरीकांमध्ये निर्माण व्हावी.

१०) संमेलनासाठी केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली यांचा सहभाग असावा.

११) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरी येथे राष्ट्रमाता जिजाऊ महिला विद्यापीठ असावे, यासाठी शासनाला साकडे घालावे.

१२) मातृतीर्थ जिल्ह्यातील विश्व विख्यात लोणार सरोवराच्या विकासामध्ये सरोवराच्या डोंगरकड्यांवरून पुर्व पश्चिम रोप वे साठी ( भूवैज्ञानिक विचारांतर्गत अध्ययनानुसार ) प्रस्ताव शासनासमोर मांडावा.

१३) मातृतीर्थ जिल्ह्यामध्ये विमानतळ असावे. जगप्रसिद्ध लोणार तसेच शेजारीच अजिंठा लेणी असल्यामुळे जिल्ह्यात ही सुविधा असण्यासाठी प्रस्ताव मांडावा.

१४) जिल्ह्यातील बुलढाणा शहरास टेकूनंच असलेल्या राजूर घाटातील प्रचंड डोंगरकडे विचारात घेता तेथे सुद्धा रोप वे बनवून पर्यटनाची व्यवस्था व्हावी.

१५) बुलढाणा शहराला जड वाहनांच्या वाहतूकीमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने चिखली रोड वरील साखळी फाट्यापासून, पश्चिमे कडून शहराला वळसा घालणारा वळण मार्ग (बायपास), घाटामधुन घाट रस्ता बनवावा लागला तरी, बनवण्यात यावा.

१६) सर्व सुशिक्षित व बेरोजगार तरुणांना व महीलांना औद्योगिक क्षेत्रात सामावून घेणाऱ्या योजना शासनाने त्वरेने राबवाव्यात.

१७) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत मुला–मुलींचे शासकीय वसतीगृह असावे.

१८) संत चोखामेळा यांचे गाव, उपेक्षित मेहूणा राजाचा तीर्थक्षेत्र या नात्याने त्वरेने सर्वांगीण विकास होईल यावर भर देण्यात यावा.

१९) सिंदखेड राजा परिसरातील सर्व ऐतिहासिक स्थळांचे जतन व सौंदर्यीकरण करण्याला विशेष प्राधान्य देण्यात यावे.

२०) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीमध्ये भव्य ग्रंथदालन व अध्यासन केंद्र असावे.

२१) मातृतीर्थ सिंदखेड राजा शहरामधून गेलेल्या नागपूर – पुणे महामार्गावरील जड व जलदगती वाहनांची वर्दळ लक्षात घेता शहराला वळण मार्ग असावा.....

२२) फुले आंबेडकरी विचाराचा व संविधानिक सामाजिक समरसतेचा प्रचार व प्रसार व्हावा...

इ. महत्त्वाचे विषय या संमेलनाच्या माध्यमातून विचारात घेऊन शासन प्रशासनाने त्यावर त्वरेने लक्ष केंद्रित करण्यासाठी विचार विनिमय करण्यावर भर कसा देता येईल यास्तव संमेलन मैलाचा दगड ठरेल अशी अपेक्षा...



ऐतिहासिक चांदणी तलाव मातृतीर्थ सिंदखेड राजा



ऐतिहासीक मोती तलाव मातृतीर्थ सिंदखेड राजा



रंगमहाल मातृतीर्थ सिंदखेड राजा



निळकंठेश्वर मंदिर मातृतीर्थ सिंदखेड राजा



# बहुजन साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

आपण सर्व लेखक वाचक कवी श्रोते सर्व बंधु आणि भगिनींनो आपण सर्व या मातृतीर्थ जिल्ह्यात राजमाता जिजाऊ चे वैचारिक वारसदार आहोत. बहुजन साहित्य संघ चिखली द्वारा आयोजित बहुजन साहित्य संम्मेलनासाठी जिल्ह्यातून व महाराष्ट्रातून येथे उपस्थित झालेले सर्व साहित्यिक, रसिक, श्रोते व बंधु भगिनींनो आपणास डॉ.गणेश गायकवाड चा सप्रेम नमस्कार, अदाब, जय भिम आजच्या संम्मेलनाचे उदघाटक भूमिपुत्र नामदार मा.प्रतापरावजी जाधव सर आजच्या संम्मेलनाचे स्वागताध्यक्ष मा डॉ.संघर्ष सावळे सर.

आज येथे प्रमुख उपस्थितीमध्ये सिंदखेड राजा मतदार संघांचे तरुण, तडफदार आमदार बंधुवर्य मनोज कायंदे सर, मा आमदार स्वेताताई महाले पाटील,मा आमदार सिद्धार्थ खरात साहेब.

सन्मानीय अतिथी झेप चे संपादक मा. डिन.एन जाधव सर, मा. डॉ. मिलिंद दहिवळे,राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मानव अधिकार संघटन, नव्वी दिल्ली. मा संजय खडसे सर

आणि बहुजन साहित्य संघर चिखलीचे संस्थापक, अध्यक्ष ॲड विजयकुमार कस्तुरे सर, निमंत्रक बबनराव महामुने, सचिव डॉ डि. व्ही खरात सर आणि बहुजन साहित्य संघांचे सर्व सन्मानीय पदाधिकारी मी आपणास सविनय नमस्कार करतो.

राजे लखूजी जाधव साहित्य नगरी सिंदखेड राजा येथील ६. व्या बहुजन साहित्य संघाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना मलाच फार आनंद होत आहे.माझ्या साहित्य कारकिर्दीतील हा सर्व्वोच सन्मान आहे.हा एका विलक्षण योगायोग कि छत्रपती शिवाजी महाराजानी त्या अठरापकडं मावळ्यांना आपल्या सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याची महुर्तमेढ रोवली. त्या शिवरायांचे आजोळ सिंदखेड राजा नगरीत एक बहुजन साहित्यिक आज एक संम्मेलनाचा अध्यक्ष म्हणून पद भुषवीत आहे.

हे मुळे शक्य झाले कारण आपण सर्व बहुजन संघांचे पदाधिकारी सर्व उपस्थित बंधु आणि भगिनींनो व सर्व सन्मानीय विचारपीठ, आपण सर्व छत्रपती शिवरायांचे वैचारिक वारसदार आहोत.राजमाता जिजाऊ चा जो वारसा घेऊन शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ते स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, स्त्री समान बहुजनांच्या सन्मानाचे रक्षन हे सर्व सद्गुण शिवरायांनी राजमाता जिजाऊ व शहाजी महाराज यांच्याकडून घेतले व तेच आपल्या जीवन पद्धतीत अंगीकारले आणि त्यामुळे एक उत्तम प्रशासक उत्तम राजा कर्तव्य दक्ष कुटुंबवच्छल पुरुष म्हणूंन त्यांची कीर्ती जगभरात पसरली. आणि आपणही तोच विचार, वारसा या साहित्य संम्मेलनात जोपसात आहोत. त्याच मुळे मी या सन्मानास पात्र होऊ शकलो याचा मला विलक्षण अभिमान वाटतो आहे. संपूर्ण भारतवर्षचं नव्हे तर एकंदरीत मानव जातींनाच जगण्याची दिशा देणारे ते महामानव या महाराष्ट्राच्या भूमितलाच आहेत हा विलक्षण योगायोग आहे. छ. शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने संपूर्ण मानव जातींचे जीवन बदलून टाकले. परंतु आजचा काळ हा फार वेगळा आहे माणसाला आपल्या ध्येयापासून वंचित करण्याचा काळ आहे त्यासाठीचं अशा साहित्य संमेलनाची आवश्यकता असते असे मला वाटते आपना सर्वापर्यंत हा ज्ञानकोष सहज उपलब्ध व्हावा म्हणून गेल्या दोन महिन्यापासून बहुजन साहित्य संघांचे अध्यक्षपासून सर्व पदाधिकारी अगदी झापतल्यागत कठोर परिश्रम करीत आहेत हे मी स्वतः अनुभवले आहे साहित्यिक हा कुठल्याही भाषेचा असो ती कविता, कथाकार, लेखक कुठल्याही भूमिकेत असो तो नीतिमत्तेशी बांधील असतो वा असावा हि किमान अपेक्षा आहे.



माझ्या एका गझलेत मी म्हटले आहे.

नको हा जगाशी उगा वाद आता
करुया मनाशीच संवाद आता ।।
नका नेहमीची ती फरयाद आता
गझल ने करूया इरशाद आता
मी गझलेत गुमफले असे वेदनेला
दुःखानेही मनाला दाद आता ।।

आपल्या दुःखानेहि आपल्याला दाद द्यावी एवढं सक्षम साहित्यकांनी व्हावे असे मला वाटते.

माझ्या एका गझलेत मी लिहिले आहे कि.

पराये गम मे अगर तुम पलके भीगे रुकते हो
जैसा मै हू वैसा तुम भी हो सकते हो ।।
पराई ऑख का आंसू जिसे अपना नाही लगता
हमारे साथ फिर उसका कोई रिस्ता नाही लगता ।।

बहुजणाच्या साहित्याचा पहिला पुरस्कर्ता म्हणून कुणाचे नावे घेतलं जात असेल तर डॉ. बाबासाहेबानी त्यांना आपले गुरु मानले ते संत कबीर त्यांनी सुद्धा एका दोह्यामध्ये म्हटले आहे कि बडा हुआ तो क्या हुआ जैसे पेड खजूर पंथी को छाया नही
फुल लागे अतिदूर

दुसऱ्यासाठी झिजण्यातचं मानवी जीवनाची खरी सार्थकता आहे. हा संदेश कबीराणी आपल्या समस्त लेखणीतून दिला आहे.

प्रत्येक पिढीत एक वाक्य आपण हमखास ऐकत असतो कि आजचा काळ फार कठीण काळ आहे परंतु असे म्हणून चालणार नाहि तर हा काळ येत्या काळासाठी तुम्ही तुमच्या लेखणीतून, कृतीतून व्यवहारातून, बोलण्यातून काय प्रयत्न केले याला सुद्धा महत्व आहे येथेच साहित्यिकांची भूमिका फार महत्वाची आहे असे मला वाटते.

या काळाचे दुसरे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या युगात वेळेची बरकत संपली आहे म्हणजे आमच्याकडे गाडी आहे, बंगला आहे, पैसे आहे पण वेळेच नाही दुसऱ्यासाठी तर नाहीच नाही पण स्वतः साठी नाही. त्यामुळे जीवनात एका प्रकारची निराशता, एकसूरी पणा आला आहे आणि त्यामुळे तर्हेतर्हेचे मानसिक तणाव वाढत आहेत.

या काळाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे हा आम मग्नतेचा काळ आहे. जो तो आपल्याच कोषात, आपल्याच विश्वात गुंग आहे. आपल्या शेजारी तर सोडा आपल्या घरात काय चालू आहे हे पाहण्याला, लक्ष द्यायलाही त्याला वेळ नाही. माझे घर माझी पत्नी, माझी मुले एवढ्यावरच माणूस समाधान मानत असतो आणि आपल्या थोर विचारवंतांनी आपणास सांगून ठेवले आहे कि तुम्हाला तुमच्या जीवनात धैर्य आनंद हवा असेल तर दुसऱ्याच्या जीवनात आनंद फुलवा

चाहत के किसी दिल मे अरमान नाही आते
पहले कि तरह घर मे माहेमान नाही आते
हर रोज फरिश्ते तो आते है मुझे मिलने लेकिन
मेरे दरपर अब इन्सान नाही आते

हे रितेपण माणसाला खायला उठत आहे.त्यावर उपाय शोधण्याची गरज आहे. आणि न्याय त्याचवेळी आम्हा साहित्यिकांची भूमिका फार महत्वाची, मोलाची ठरते. पुस्तके वाचने, पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करून देणे व साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देन्यासाठी असे साहित्य संमेलन घेणे अगत्याचे आहे असे मला वाटते. सतत च्या वाचनाने, लिखाणाने आपण फार मोठे साहित्यिक कदाचित होणार नाहीत परंतु एका चांगला माणूस आपण निश्चित त्या दिशेने मार्गीकृमन करू हे यात शंका नाही. म्हणून मी येथे उपस्थित शासनाचे जे प्रतिनिधी आहेत त्यांना अनुरोध करतो कि मानवीजीवनात नित्तीमत्ता रुजवण्यासाठी, चैतन्य फुलवण्यासाठी अशा प्रकारचे साहित्य संमेलन अगदी गावोगावी घेणाऱ्या बहुजन साहित्य संघ नव्हे तर इतर हि सर्व अराजकीय संघटनाना शासनाने सढळ हाताने मदत करावी हि विनंती मी आपणास करतो.

अशा साहित्य संमेलनातून रसिकांची वैचारिक भूक भागविली जाते, लिहिल्या हाताने व्यासपीठ मिळते. थांबवण्याआधी बहुजन साहित्य संघांचे अध्यक्ष सर्व पदाधिकारी यांचा मी मनपूर्वक आभारी आहे. आपण मला या साहित्य संमेलणाचा अध्यक्ष पदाचा सन्मान दिला. सिंदखेड राजा या मातृतीर्थ नागरीतील सर्वच बंधु भगिनीचा मी शतशः ऋणी आहे. आपण आपल्या मातृतीर्थ नगरीत सन्मान होते हे कुठल्याही पोराचे भाग्य उजळल्यासारखे आहे. आपल्या या सन्मानाची परत फेड करणे कदापि शक्य होणार नाही. हा जन्म आपल्या ऋणात आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच पत्रकार बांधवानी या संमेलनाची प्रसिद्धी अगदी भरभरून दिली. त्याबद्दल मी आपणास हि धन्यवाद देतो. मातृतीर्थ नगरीचे आमदार मनोज भाऊ कायंदे मी यांचा व्यक्तीश ऋणी आहे. आपल्या भक्कम पाठबळशिवाय हे संमेलन यशस्वीरित्या होणे शक्य नव्हते सदैव आपल्या ऋणात आहे.

जाता जाता एका गझल सांगतो आणि थांबतो


गरजतो मधून जेव्हा मी वयोवृद्ध होत जातो तुमच्या नसामधूनी मी रक्त होत जातो!!
हे नाव हि उपाधी सन्मान होईल
तोडून हि बंधने मुक्त होत जातो!!
हे वेद हि पुराणे वाचलेच नाही माणूस वाचण्याचे मी रक्त होत जातो!!
लडल्याशिवाय मनला तो रोज देई दर्शन
रुग्ण होतो विठ्ठल मी भक्त होत जातो!!
आहेत रिक्त जागा देतो भरून साऱ्या
नंतर च्या ठिकाणी मी अतिरिक्त होत जातो!!
हृदयाच्या झोळीमधून गझलेचे मोती आणतो
हे वाटतो इथे अन मी रिक्त होत जातो

धन्यवाद..

**–डॉ गणेश गायकवाड**

## महाराष्ट्राच्या मातीतील सर्व रसिक नागरिकांना मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी मधून सप्रेम नमस्कार

**लोकनेता न्यूज नेटवर्क**



सूर्यालाही साकडे घालण्याची प्रचंड इर्शा उरात पोसून मानवतेच्या सेवा संशोधन साहित्यांतराळात सचेतन जिद्दीने अखंड झेप घेणाऱ्या झुंजार अक्षर यात्रींना वैचारिक आविष्करणाचे स्मृतिपीठ चिरंतन उपलब्ध राहण्यासाठी आणि युगे युगे धुमसणाऱ्या ज्वालामुखींना उद्रेकाचा मुक्त श्वास घेण्याचे औचित्य साधण्यासाठी संस्थापित बहुजन साहित्य संघ, चिखली च्या वतीने ह्या सहाव्या बहुजन साहित्य संमेलन २०२५ चे आयोजन सिंदखेडराजा सारख्या ऐतिहासिक व सामाजिक चळवळीचा केंद्रबिंदू व वारसा असलेल्या नगरीत करीत असताना मन हर्षोल्हासाने भरून जात असून या निमित्ताने संपन्न होणाऱ्या या वामय संस्कार सोहळ्याचे आपण चक्षुर्वैसत्यम साक्षीदार होण्यासाठी आपणास हे आग्रहाचे निमंत्रण देत आहोत.

आपल्या उपस्थितीसह शुभेच्छांची सुध्दा आम्ही वाट पाहत आहोत.

यावेच ही विनंती

**–डॉ. विजयकुमार कस्तुरे,**
**ॲडव्होकेट, चिखली.**

## ६ वे बहुजन साहित्य संमेलन सिंदखेड राजा बहारदार कविसंमेलन कवी संमेलनाध्यक्ष कवी प्रा.वा.ना.आंधळे यांचा संक्षिप्त परिचय

**लोकनेता न्यूज नेटवर्क**



कवी प्रा.वा. ना.आंधळे हे गेल्या चार दशकांपासून काव्य,ललित व समीक्षा लेखन करीत असून त्यांचा फर्मान आणि इतर कविता हा काव्यसंग्रह,निवडक फर्मान हा काव्यसंग्रह तसेच साहित्य शिवार हा समीक्षा ग्रंथ प्रसिद्ध आहे.प्रा.आंधळे यांनी यापूर्वी तीन राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले असून त्यांच्या कविता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,मुंबई विद्यापीठ,बिदर विद्यापीठ कर्नाटक, गुलबर्गा विद्यापीठ कर्नाटक तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे यांच्या बालभारती व युवकभारती पाठयपुस्तकांत,गुजरात राज्य शाळा पाठयपुस्तकांत अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.त्यांच्या फर्मान आणि इतर कविता या काव्यसंग्रहावर महाराष्ट्रातील चाळीस नामवंत समीक्षकांनी समीक्षा लेखन केलेय.त्यांची 'आई मला जन्म घेऊ दे' ही स्त्री भ्रूण हत्ये विरोधातील प्रबोधन कवितेचे इंग्रजीसह पंचेचाळीस भारतीय भाषेमध्ये भाषांतर झाले असून सदर कविता देशासह सातासमुद्रापार जाण्याचा मान या कवितेला लाभलाय. आजच्या कवी संमेलनाचे अध्यक्षपद ते भूषवित असून या घटनेचा आयोजक म्हणून मनस्वी आनंद आहे.या सर आपले मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत आपले स्वागत आहे.

# कॉंक्रिटीकरण कामे अर्धवट न करता रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत (एन्ड टू एन्ड) पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबई महानगरात सिमेंट कॉंक्रिट रस्ते प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने आणि प्रभावीपणे सुरू आहे. दिनांक ३१ मे २०२५ पूर्वी कॉंक्रिटीकरण कामे पूर्ण झाली पाहिजेत. त्यासाठी सूक्ष्म नियोजन (मायक्रो प्लानिंग) करणे, रस्तानिहाय काम पूर्णत्वाची तारीख निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासोबत, सध्या सुरू असणारी कॉंक्रिटीकरण कामे अर्धवट न करता रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत (एन्ड टू एन्ड) पूर्ण करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कामाचा आवाका आणि मर्यादित कालावधी यांची सांगड घालून देखील संपूर्ण रस्ता कॉंक्रिटीकरण काम पूर्णत्वास जाणार नसेल तर, रस्त्यातील चौक ते चौक (जंक्शन टू जंक्शन) काम पूर्ण करावे, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. रस्तेकामे सुरू असताना वाहतुकीचे योग्य नियमन करण्यासाठी सुयोग्यपणे रस्तारोधक (बॅरिकेड्स) लावावेत, बांधकामाचा राडारोडा विखुरलेला नसावा, असे निर्देश देखील श्री. बांगर यांनी दिले.



मालाड (पश्चिम) येथील दादीसेठ मार्ग येथे मलनि:सारण प्रचालन (सीवेज ऑपरेशन्स) कामासाठी चेंबरचे खोदकाम केल्यानंतर तेथे सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष करुन ते धोकादायक पद्धतीने खुले ठेवल्याप्रकरणी संबंधित अभियंत्यास नोटीस बजाविण्याचे व सक्त कारवाई करण्याचे निर्देश श्री. बांगर यांनी यावेळी दिले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेली रस्ते कॉंक्रिटीकरण कामे मध्यावस्थेत आहेत. या अंतर्गत मालाड पश्चिम काचपाडा येथील रामचंद्र मार्ग, कांदिवली पश्चिम येथील पारेख गल्ली, महावीर नगर मार्ग कॉंक्रिटीकरण कामाची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी काल (दिनांक २७ मार्च २०२५) रात्री प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.या नियोजित दौऱ्यादरम्यान श्री. बांगर यांनी मालाड पश्चिम येथील दादीसेठ मार्ग, मालाड शॉपिंग सेंटर जवळील मार्ग आणि बालाजी हॉटेल समोरील कॉंक्रिटीकरण कामांची देखील आकस्मिक पाहणी केली.मालाड पश्चिम येथील दादीसेठ मार्गावर कॉंक्रिटीकरण कामाबरोबरच मलनि:सारण प्रचालन विभागाचे कामकाज सुरू आहे. या ठिकाणी हमरस्त्यावर खोदकाम करत केवळ एकाच बाजूने बॅरिकेड्स लावण्यात आले होते. तर उर्वरित बाजूने चेंबर धोकादायक पद्धतीने खुले असल्याची बाब निदर्शनास आली. या प्रकरणाची दखल घेत संबंधित अभियंत्यास नोटीस बजाविण्याचे व सक्त कारवाई करण्याचे निर्देश श्री. बांगर यांनी दिले. श्री.बांगर यांच्या आदेशानुसार, चेंबरला तातडीने चहुबाजूने बॅरिकेड्स लावण्यात आले.मालाड शॉपिंग सेंटर जवळील मार्ग आणि बालाजी हॉटेल समोरील कॉंक्रिटीकरण कामांची आकस्मिक पाहणी करताना श्री. बांगर यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली. एका बाजूचे कॉंक्रिटीकरण काम करताना दुस–या बाजूच्या रस्त्याची पातळी समतल असावी, जेणेकरून वाहतूक सुरळीत राहिल. विशेषत: दुचाकींसाठी वाहतुकयोग्य रस्ता असावा, याची दक्षता बाळगावी. उपयोगिता वाहिन्यांचे स्थलांतरण करताना खबरदारी घ्यावी, असे निर्देश श्री.बांगर यांनी दिले. कॉंक्रिट रस्ते प्रकल्पाची अंमलबजावणी करताना अभियंत्यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळी (ऑन फिल्ड) उपस्थित राहणे अनिवार्य आहे. रस्तेकामादरम्यान, वाहतुकीचे योग्य नियमन करण्यासाठी सुयोग्यपणे रस्तारोधक (बॅरिकेड्स) लावण्याची जबाबदारी कंत्राटदारांची असली तरी त्यावर रस्ते विभागाच्या अभियंत्यांचे नियंत्रण हवे, असेदेखील श्री.बांगर यांनी नमूद केले.मालाड पश्चिम काचपाडा येथील रामचंद्र मार्ग, कांदिवली पश्चिम येथील पारेख गल्ली, महावीर नगर मार्ग कॉंक्रिटीकरण कार्यस्थळी नागरिकांसाठी माहिती फलक प्रदर्शित करण्यात आले आहेत. त्यावर काम सुरु केल्याचा दिनांक, काम संपुष्टात येण्याचा दिनांक, कामाचा कालावधी, रस्त्याची लांबी, रुंदी, कामाचे ठिकाण इत्यादी माहिती देण्यात आली आहे. त्याच बरोबर 'क्यू आर कोड' स्कॅन करण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. बांगर यांनी 'क्यू आर कोड'चे मोबाईलद्वारे स्कॅनिंग करत पडताळणी केली.या पाहणी दौऱ्या दरम्यान प्रत्यक्ष कार्यस्थळी स्लम्प चाचणी, कोन चाचणी करण्यात आली. त्यांचे परिणाम (रिझल्ट) योग्य असल्याचे निदर्शनास आले. याचबरोबर, भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी. मुंबई) च्या चमूने कार्यस्थळावरील प्रयोगशाळेत पेव्हमेंट क्वालिटी कॉंक्रिट (पीक्यूसी) नमुन्याची 'क्यूब टेस्ट' केली. या आकस्मित चाचणीचे परिणामदेखील योग्य आढळून आले. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त श्री. बांगर म्हणाले की, ज्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे, त्या रस्त्यांना थर्मोप्लास्ट, झेब्रा क्रॉसिंग, कॅट आईज, चौकांमध्ये पिवळ्या थर्मोप्लास्ट रंगाचे ग्रीड बसविणे इत्यादी कामे पूर्ण करावीत, जेणेकरुन त्या रस्त्यांची उपयुक्तता खऱ्या अर्थाने साध्य होईल, तसेच परिसराच्या सौंदर्यात भर पडेल.भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी. मुंबई) चे सहायक प्रा. सोलोमन डिब्बार्ती, महानगरपालिकेचे प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) श्री. गिरीश निकम, उप प्रमुख अभियंता (पूर्व उपनगरे) श्री. संजय बोरसे यांच्यासह गुणवत्ता नियंत्रण संस्थेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## आयटीआय महाविद्यालयाच्या प्रशिक्षनाणे केला विदयार्थ्याचा घात

# मुलाच्या मृत्यूची हाक शासन दरबारात,प्राचार्य हर्षद राजकुमार यांच्या निलंबनाची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा | इस्माईल महेबूब शेख**

निलंगा येथील आयटीआय महाविद्यालयाचा विध्यार्थी शिक्षण घेऊन तालुक्यातील तांबळा या गावी प्रशिक्षणासाठी दुचाकीवर आपले सहकारी आणि वर्ग सहकारी यांच्या सोबत जात होता. एका पिकअपने दुचाकीस जोराची धडक दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा गंभीर अवस्थेत जागीच मृत्यू झाल्याची घटना दि. २५ मार्च रोजी घडली. कृष्णा निवृत्ती कांबळे मुक्काम पोस्ट शिऊर तालुका निलंगा जिल्हा लातूर वय १७ वर्षे हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था निलंगा जिल्हा लातूर येथे मोटार मेकॅनिक या व्यवसायात प्रथम वर्षात शिकत होता. कृष्णाला ऑन जॉब ट्रेनिंग च्या नावाखाली त्यांनी कॉलेज समोरच्याच एका गॅरेजमध्ये दोन महिने कामासाठी ठेवले. कृष्णा कडून जबरदस्तीने काही झाल्यास मी स्वतः जबाबदार आहे असे लिहून घेतले. पालककडून कोणत्याही प्रकारची सही करून घेतली नाही. वास्तविक पाहता कृष्णाच्या वडिलांचे जास्त शिक्षण न झाल्यामुळे त्यांना तांत्रिक गोष्टीची कसलीही माहिती नव्हती. मी मजुरी करून माझे घर चालवतो. मला दोन मुले आहेत. माझा हा लहान मुलगा कृष्णा निवृत्ती कांबळे नियमित प्रशिक्षणासाठी जात होता. त्याला पास काढून देण्यात आले होता. दिनांक २५ मार्च २०२५ रोजी माझ्या मोठ्या मुलाचा म्हणजेच आदेश निवृत्ती कांबळे याचा तीन वाजता फोन आला व लहान मुलगा कृष्णा निवृत्ती कांबळे याचा अपघात झाल्याचे कळवले. मी तात्काळ साडेतीन वाजता दवाखान्यात गेलो. तिथे मला माझा मुलगा कृष्णा निवृत्ती कांबळे जागेवर मृत पावल्याचे सांगितले. त्यावेळी दवाखान्यात माझ्या मुलाला कोणत्याही प्रकारची मदत या कॉलेज कडून किंवा येथील कर्मचाऱ्यांकडून मिळाली नाही.

वास्तविक पाहता ऑन जॉब ट्रेनिंग (जगढ) साठी १८ वर्षापेक्षा जास्त मुलांना पाठवायला पाहिजे होते. याचे हे पहिलेच वर्ष सुरू होते. त्यामुळे त्याला व्यवस्थित ट्रेनिंग झालेली नव्हते. ऑन जॉब ट्रेनिंगचा हा नियमच आहे की प्रशिक्षणावेळी त्याचे शिक्षक तेथे हजर पाहिजेत. माझा मुलगा जगढ साठी पाठवला असताना त्याला टू व्हीलर घेऊन बाहेर जाण्यासाठी कोणी भाग पाडले? तेथे शिक्षक उपस्थित का नव्हते? त्यांनी या



आस्थापनेला सर्व नियम सांगितले होते का? या आस्थापनेला ऑन जॉब ट्रेनिंग (जगढ) साठी परवानगी देताना या आस्थापनेकडे १० पेक्षा जास्त कर्मचारी नसताना, पुरेशी सुरक्षिततेची साधने उपलब्ध नसताना, कोणी सर्वे केला, या संस्थेचे प्राचार्य श्री हर्षद राजुरकर यांनी स्वतः सर्वे करून सर्व सुरक्षिततेची साधने, आस्थापनेचे नियम यांची खात्री करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेऊन हा सामंजस्य करार करणे आवश्यक होते. श्री हर्षद राजुरकर यांनी सर्वे करताना कोणतेही नियम पाळले नाही. त्यामुळे अत्यंत साधारण अशा जिथे सोयीसुविधा उपलब्ध नाहीत अशा छोट्या दुकानात माझ्या मुलाला अक्षरशः कामासाठी पाठवले व यात माझ्या मुलाचा नाहक मृत्यू झाला. माझे व माझ्या कुटुंबाचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले. एवढा मोठा प्रसंग घडला असताना सुद्धा संस्थेतील प्राचार्य हर्षद राजूरकर व इतर कर्मचारी यांनी अंत्यविधी किंवा इतर कोणत्याही कार्यासाठी कोणतीही मदत केली नाही. उमाकांत निवृत्ती गायकवाड आणि भरत किसन कांबळे यांनी घटना घडल्यानंतर फोन केला असता कोणताही प्रतिसाद दिला नाही.

श्री हर्षद राजुरकर यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था निलंगा जिल्हा लातूर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भूम, जिल्हा धाराशिव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर या तिन्ही संस्थेत अशाच प्रकारचे ऑन जॉब ट्रेनिंग साठी सामंजस्य करार केलेले आहेत. त्या आस्थापनांच्या बाबतीत तेथे तज्ञ मार्गदर्शक आहेत का? सुरक्षिततेची पुरेशी साधने उपलब्ध आहेत का? आस्थापना या मुलांना प्रशिक्षण देते आहे का? आस्थापनेने त्यांना कोणतेही जोखमीचे काम दिले नाही पाहिजे? आस्थापनेचा परिसर सोडून बाहेरच्या जागी पाठवले गेले नाही पाहिजे? असे अनेक प्रश्न यातून निर्माण झाले आहेत.

माननीय मंत्री महोदय यांना सविनय विनंती आहे की कृष्णाच्या मृत्यू हा अपघात नसून प्राचार्य श्री हर्षद राजूरकर व त्याचे शिक्षक यांनी केलेल्या निष्काळजीपणामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. या दोघांना तात्काळ निलंबित करावे. या दोघांवरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद करून त्यांना अटक करावी. आमची रीतसर त्यांच्या विरोधात फिर्याद नोंद करावी. कांबळे कुटुंब उघड्यावर पडले आहे. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद न केल्यास मला प्राणांतिक उपोषण आपल्या घरासमोर करावे लागेल. कृपया मानवतेच्या दृष्टिकोनातून इतर मुलांचे प्राण वाचवण्यासाठी आणि अशा निष्ठुर अप्रामाणिक कर्तव्यहीन अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून अटक करावी.अशी विनंती कांबळे परिवाराकडून करण्यात आली.

# साईभक्तांसाठी साई संस्थानचा मोठा निर्णय; पाच लाखांपर्यंतचे विमा संरक्षण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव | संदीप कदम**

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनाला मोठ्या संख्येने भाविक येत असतात.यामुळे वर्षभर येथे भाविकांची मोठी गर्दी असते.या अनुषंगाने साई दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.साई संस्थानने साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठा निर्णय घेतला आहे.येथे येणाऱ्या भाविकांना पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शिर्डीच्या साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी देश–विदेशातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी शिर्डीत येत असतात.मात्र बऱ्याचदा दर्शन घेण्यासाठी येत असताना किंवा दर्शन घेऊन परतताना काही दुर्घटना घडत असतात.याच अनुषंगाने साई संस्थानने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.यात भाविकांना सुरक्षा कवच देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.अर्थात येथे येणाऱ्या भाविकांसाठी हि आनंदाची बातमी आहे. साईबाबा दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विमा संरक्षण देण्याचा मोठा निर्णय साई संस्थानने घेतला आहे.मात्र साईभक्तांनी दर्शनाला येण्याअगोदर साई संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर आपली नोंदणी करणे बंधनकारक आहे.यामुळे घरातून निघाल्यानंतर साई मंदिरात दर्शन करेपर्यंत काही अप्रिय घटना घडली,तर पाच लाखांपर्यंतचे विमा संरक्षण संबंधिताला किंवा त्याच्या कुटुंबीयांना मिळणार आहे.

# जनाबाई खराणे यांना विठ्ठल पुरस्काराने उद्योग मंत्री उदय सावंत यांच्या हस्ते शिर्डी येथे सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पा.कळकेकर**

वारकरी साहित्य परिषदेचे १३ वे मराठी संत साहित्य संमेलन शिर्डी येथे आयोजित करण्यात आले होते वारकरी साहित्य परिषदेचे नांदेड जिल्ह्यात गाव तिथे जनाबाई मुक्ताबाई हरिपाठ महिला मंडळाची स्थापना करून वारकरी साहित्य परिषदेच्या कार्याची ग्रामीण भागापर्यंत कार्याची माहिती देऊन कार्य करणाऱ्या वारकरी साहित्य परिषदेच्या



नांदेड उत्तर जिल्हा अध्यक्ष ह .भ. प जनाताई खराणे यांच्या कार्याची दखल घेऊन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील काकाजी यांच्या उपस्थिती महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री सन्माननीय नामदार उदय सावंत, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील ,श्रीकांत महाराज ठाकूर बुवा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष महाजन जाधव महाराज दगडवाडीकर ,सुधाकर महाराज पवळे, भुजंग महाराज रोडगीकर ,वैजनाथ ठोंबरे ,अन्नपूर्णाताई खराणे, मैनाताई खराणे, जयनंदा चांमले वारकरी साहित्य परिषदेचे जिल्ह्यातील शाखाप्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जि.प्रा.शाळा मुळझरा येथील मुख्याध्यापक श्री मारोती चिंतलवाड सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर | राम चिंतलवाड**

किनवट तालुक्यातील मौजे मुळझरा येथील जि.प्रा.शाळा मुळझरा येथील मुख्याध्यापक श्री मारोती संभाजी चिंतलवाड सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न. दि ३१/०३/२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे गावकऱ्यांच्या वतीने संकुल भिशी अंतर्गत च्या शिक्षकांच्या वतीने दि.२८/०३/२०२५ रोजी ५८ वर्ष सेवापुर्ती झाल्यामुळे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



चिंतलवाड सर यांचे शैक्षणिक कार्य पाहता त्यांनी जनगणना सर्वेक्षण, मतदान कार्य केंद्राध्यक्ष, मतदार नोंदणी बीएलओ, वृक्षारोपण संगोपन, गाव सर्वेक्षण असे विविध कार्य केले आहेत.असे म्हणतात शिक्षक हा सर्व गुण संपन्न असायला पाहिजे त्या म्हणीप्रमाणे मुळझरा येथील मुख्याध्यापक श्री मारोती संभाजी चिंतलवाड यांनी या उक्तीला सत्यात उतरवले आहे. चिंतलवाड सर यांना वाचन,लेखन,समाजकार्य करण्यात आवड होती.या दरम्यान त्यांनी चित्र काढणे, कविता करणे, योगा करणे अशा प्रकारचे विविध छंदही जोपासले. तीन अंकी नाटकातही त्यांनी खलनायकाची भूमिका केली. अनेक भजन स्पर्धेत सहभागी होते. तसेच काही सामाजिक विवाह मेळावे पण त्यांनी भरवले. त्यांच्या परिवारामध्ये तीन मुली, त्यामध्ये एक विवाहित मुलगी, एक मुलगा, आई वडील आहेत. सौ. मंगल चिंतलवाड मॅडम (लाईफस्टाईल फिटनेस सेंटर नांदेड ) यांनी चिंतलवाड सर यांच्या कार्याविषयी गुणगौरव भाषण केले प्रियंका चिंतलवाड ह्या मुलींनी सुद्धा वडिलांविषयी मनोगत व्यक्त केले आहे .या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे अध्यक्ष केशव मेकाले सर (विस्तार अधिकारी इस्लापूर तसेच पंचायत समिती हिमायतनगर गटशिक्षण अधिकारी) होते. तसेच शंकर वारकड सर (केंद्रप्रमुख भिशी,) शिवाजी राठोड सर, मु.अ.भिसी, तसेच केंद्रांतर्गत असलेले सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या. ज्ञानदीप कोचिंग क्लासेसचे संचालक तथा दैनिक अर्थ चे संपादक व रिपब्लिक २४ न्युज चे मुख्य संपादक डि.एन.गुंडेकर सर, व लोकशाही पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा युवा पत्रकार संघटनेचे सचिव, तसेच चिंतलवाड सरांचे बंधू राम संभाजी चिंतलवाड तसेच गावातील पालकासह गावकरी मंडळी उपस्थित होती.या वेळी मान्यवरांचे सत्कार करण्यात आले सत्कारमूर्ती श्री मारोती संभाजी चिंतलवाड सर यांना पत्नीसह आहेर देण्यात आला. विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी श्री मारुती चिंतलवाड सर यांनी आपल्या २७ वर्षाच्या शैक्षणिक कार्यातील अनुभव व्यक्त केला. तसेच सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून कार्यक्रम नगर भोजनानंतर संपन्न झाला.

# शेतात जाण्यासाठी तहसीलदार शिंदे यांच्या मध्यस्थीतून रस्ता खुला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी मध्ये अनेक वर्षापासून ७ ते ८ शेतकऱ्यांचा जाण्या येण्याचा रस्ता बंद असून शेतकऱ्यांना शेतीमध्ये मशागतीसाठी दळवण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने जमीन पडीक होती या समस्याची दखल सामाजिक कार्यकर्ते गोरख आढाव यांनी घेऊन अहिल्यानगरचे तहसीलदार संजय शिंदे यांच्या माध्यमातून सोडवण्यात आली. तहसीलदार शिंदे हे स्वतः येऊन रस्ता खुला केला व शेतकऱ्यांचे आपसातले वाद मिटवण्यात आले व शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही तसेच इतर ठिकाणी ज्या ज्या शेतात जाण्यासाठी रस्ते नाही त्या शेतकऱ्यांनी या गोष्टीचा अवलंब करून बंद केलेले रस्ते तसेच आपापसातली वाद मिटून रस्ते खुले करावे असे आवाहन अहिल्यानगरचे तहसीलदार संजय शिंदे यांनी केले व यावेळी सामाजिक कार्यकर्ते गोरख आढाव म्हणाले की, अशाच



प्रकारे पिंपळगाव माळवी मधील शेतकऱ्यांचा बोध इतरही शेतकऱ्यांनी घेऊन तसेच पंचक्रोशीतील गावातील शेतकऱ्यांनी घ्यावा व आपल्यामुळे दुसऱ्या शेतकऱ्यांना अडचण येणार नाही याची देखील दखल घेऊन रस्ते खुले करण्याचे आव्हान करण्यात आले असून शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदार संजय शिंदे यांचा सत्कार करताना सामाजिक कार्यकर्ते गोरख आढाव, सुहास लांडगे, किरण बाबर, गणेश आढाव, अरुण बाबर, सोमनाथ आढाव, रावसाहेब आढाव, महादेव आढाव, रावसाहेब सोनार, देवराम शिंदे, महादेव भोसले, गणेश आढाव, प्रकाश बाबर आदी शेतकरी उपस्थित होते.

# तोष्णीवाल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात येथे गुड समॅरिटन प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

टाटा मोटर्स व बी.व्ही. जी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने नवीन रस्ते सुरक्षा अँप्लिकेशन वापरासाठी सज्ज.टाटा मोटर्स व बी.व्ही. जी. फाउंडेशन यांनी एकत्रितपणे रस्ते सुरक्षा वाढीच्या दृष्टिकोनातून नवीन अँप्लिकेशन तयार केले आहे. या अँप्लिकेशनला गुड समॅरिटन रस्ता सुरक्षा अँप असे नाव देण्यात आले आहे उच्च तंत्रज्ञान व सामान्य जनतेकडून केली जाणारी अपघात प्रसंगी कृती यांच्या माध्यमातून रस्ते सुरक्षा व आपत्कालीन परिस्थितीमध्ये दिली जाणारी मदत वाढविणे या योजनेचे उद्दिष्ट आहे.




रस्ते अपघातातील जखमींपर्यंत कमीत कमी वेळेमध्ये वैद्यकीय मदत पोहचण्यासाठी सध्याच्या १०८ रुग्णवाहिका पाठविण्याच्या कार्य प्रणालीमध्ये या अँप्लिकेशनचा सुयोग्य वापर करण्यात आला आहे. गुड समॅरिटन म्हणजे काय सद्भावनेने प्रेरित होऊन अपघात किंवा एखाद्या दुर्घटनेतील जखमी व्यक्तीला मदत करणारा स्वयंसेवक . भारतात रस्ते अपघातातील मृत्यूचे प्रमाण खूप जास्त आहे. अशातच कायदेशीर कटकटींना घाबरून लोक मदतीस पुढे येत नाहीत व त्यामुळे वैद्यकीय मदत मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे सन २०१६ मध्ये गुड समॅरिटन कायदा लागू करण्यात आला, त्यामुळे सामान्य लोकांना प्राथमिक उपचारामध्ये बाधा न आणता मदत करणाऱ्यास कायद्याचे संरक्षण मिळाले. तसेच १३ मार्च, राष्ट्रीय गुड समॅरिटन दिवस म्हणून साजरा केला जातो. याचे औचित्य साधून जास्तीत जास्त लोकांमध्ये अपघात ग्रस्तांना मदत करण्याची सद्भावना जागृत करणे, प्राथमिक उपचार करणे, त्यांची काळजी घेणे तसेच या अँप्लिकेशनचा वापर करण्या संदर्भात जनजागृती अभियान बी.व्ही. जी. फाउंडेशन यांच्या माध्यमातून दि. २८ मार्च २०२५ रोजी १०८ चे लातूर विभागीय व्यवस्थापक डॉ सुनिल कुलकर्णी, संभाजीनगर विभागीय व्यवस्थापक श्री वैभव बाजारे, हिंगोली जिल्हा व्यवस्थापक श्री प्रमोद हिवराळे सहाय्यक व्यवस्थापक श्री गणेश बाहेती, १०८ वैद्यकीय अधिकारी डॉ मंगेश कव्हर, डॉ विजय इंगळे, डॉ सुभाष गीते, श्री ऋषीकेश मिसाळ, रुग्णवाहीका चालक श्री गजानन दराडे, श्री शेषराव काकडे यांनी याबाबतचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून १०८ रुग्णवाहिकेचे प्रात्यक्षिक दिले व गुड समॅरिटन ऐप डाउनलोड करून देऊन त्याचा उपयोग कसा करायचा याचेही प्रात्यक्षिक दिले आणि १०८ सेवेबाबत संपूर्ण माहिती देऊन मार्गदर्शन केले. यावेळी तोष्णीवाल महाविद्यालयाचे प्राचार्य श्री एस. जी. तळणीकर, प्रा. फड, प्रा. इंगोले, प्रा. काटोळे, प्रा. सावळे, प्रा. चाटसे, प्रा. गायकवाड, प्रा. प्रकाश देशमुख, प्रा. कदम, प्रा. भूक्तर इतर सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद हे उपस्थित होते. तसेच पूर्ण राज्यभरामध्ये २७ ठिकाणी समॅरिटन प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या आहेत, यामध्ये अंदाजे दीड हजार लोकांना याचे प्रशिक्षण दिले गेले आहे.

# विद्यार्थी प्रिय शिक्षिका अनुराधा मानेकर सेवापूर्ती गौरव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**

आज अनुमावशी म्हणजेच अनुराधा मानेकर या २६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. आज पासून २६ वर्षांपूर्वी म्हणजेच मे १९९९ ला अनु मावशी जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी च्या शाळेत सेविका म्हणून रुजू झाल्या आणि त्या दिवशीपासून आजपर्यंत त्यांनी शाळेला मनापासून सेवा दिली शाळेत रुजू होताना सोबत आपल्या दोन मुली ९ वर्षाची कल्पना आणि सव्वा वर्षाची मनीषा यांना घेऊन आल्या. दोन्ही मुलींना चांगले शिक्षण दिले. मोठी मुलगी मनीषा हिने डीएड केले. छोटी मुलगी कल्पनाने इंजीनियरिंग केले पण नियतीचा आघात झाला आणि मनीषा इंजिनिअरिंगची डिग्री पूर्ण झाल्यानंतर डिग्री आणण्यासाठी जात असतानाच तिचा अपघात झाला आणि तिची प्राणज्योत मालवली. एवढया गुणी मुलीचे असे झाले हे ऐकून सर्व शाळा, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ तसेच नातेवाईक सर्वच हळहळले. एवढया मोठा आघातातून सावरणे मावशींना अवघड होते. दुःख विसरणे शक्य नव्हतं पण त्याला मागे टाकून पुन्हा कर्म हेच दैवत मानून हळूहळू सेवेला सुरुवात केली.शाळेत विद्यार्थ्यांमध्ये मन रमवण्यास सुरुवात केली.

सेवेला साधना समजून सेवा करणाऱ्या अनु मावशींकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. एवढ्या सेवेत त्यांना कधीच कोणी मोठ्या आवाजात बोललेले ऐकले नाही. लहान असो वा मोठे प्रत्येकाला आदराने बोलत.

अनुमावशी शाळेत आल्या त्यांच्या आधी कमलमावशी शाळेत होत्या. कमल मावशी नावाला सेविका होत्या पण प्रत्येक विद्यार्थ्यांवर त्यांचा मुख्याध्यापकासारखा दरारा होता. मैदानावर फिरणाऱ्या, वर्गातून बाहेर निघालेल्या मुलाला कमल मावशी हटकल्याशिवाय राहत नव्हत्या.शाळेच्या



मैदानात आलेल्या कोणत्याही व्यक्तीची चौकशी केल्याशिवाय त्या राहत नव्हत्या विद्यार्थी त्यांना घाबरतही होते अन आदरही करत होते. अनु मावशी शाळेत रुजू झाल्या आणि त्या दोघींची एक टीम झाली. कमल मावशींनी सांगावे आणि अनु मावशींनी ऐकावे. एवढे काम असूनही कधीच तू तू मी मी नाही. तर 'आपण मिळून' हे त्यांनी ब्रीदवाक्य ठरवले. आणि सर्वांसाठी टीमचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

जि. प. हा. विष्णुपुरी ही शाळा सततच एक एक नावलौकिक प्राप्त करत असते. हे नावलौकिक प्राप्त करत असताना तिथे कार्य करत असलेले शिक्षक, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, शालेय शिक्षण समिती आणि ग्रामस्थ यांचा खूप मोठा वाटा आहे. विद्यार्थी हा तर शाळेचा केंद्रबिंदू. इथले विद्यार्थी सर्वच क्षेत्रात सगळीकडेच आघाडीवर असतात. शालेय अभ्यासक्रमा बरोबरच सहशालेय उपक्रमातही हिरीरीने भाग घेतात. शाळेतील अभ्यासक्रमा सोबतच स्पर्धा परीक्षा, क्रीडा, नृत्य, भाषण, वादविवाद, कुठेही विद्यार्थी पुढेच. इथले सर्वच शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचवण्यासाठी एक ध्यास, एक स्वप्न घेऊन काम करतात. शालेय शिक्षण समिती सततच इथल्या विद्यार्थ्यांना चांगले काय देता येईल यासाठी प्रयत्नशील असते. ग्रामस्थही तन-मन-धनाने शाळेला मदत करतात. याचबरोबर शाळा ही जी उत्तुंग भरारी घेत आहे त्यात सर्वच घटकांबरोबर आपलेही परिश्रम लाख मोलाचे आहेत. शाळेत कोणताही कार्यक्रम असो किंवा शाळेला कुणाची भेट असो सकाळी साडेसातला मावशी शाळेच्या चाव्या घेऊन हजर राहत असत. मावशी तुम्ही आजपर्यंत शाळेला ची सेवा दिली, विद्यार्थ्यांची मावशी म्हणून जी काळजी घेतली, आमच्यासारख्या शिक्षिकांना लेक म्हणून जो जीव लावलात,सर्वांनाच आपले समजून जो आपलेपणा दिलात ती आपुलकी, जिव्हाळा आपलेपणा आम्ही कधीच विसरू शकणार नाहीत. आम्ही सर्वचजण सदैव आपल्या ऋणात राहू. येणारी पिढी सुद्धा आपल्यासारखे निर्व्याज, प्रामाणिक, कपाळावर आठी ना आणता, चेहऱ्यावर स्मित ठेवून काम करणारी येवो एवढी अपेक्षा काळेश्वराच्या चरणी व्यक्त करते.

# आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत जगदिश लोंढे यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.कळकेकर**

नवीन नांदेड सिडको हडको येथील शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित, इंदिरा गांधी हायस्कूल सिडको येथे सहशिक्षक म्हणून श्री.जगदीश माणिकराव लोंढे यांनी २९ वर्ष सेवा करुन सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी पुढील भावी कार्यास शुभेच्छा देऊन शुभआशिर्वाद दिले.यावेळी शिवसेना शहरप्रमुख सुहास खराणे पाटील,भाजपा मंडळ अध्यक्ष वैजनाथ देशमुख,कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक मुख्याध्यापक श्री.जी.एम.शिंदे,प्राथमिक मुख्याध्यापिका सौ.ए.डी.शिंदे, जेष्ठ शिक्षक डॉ.ए.डी.गरड,ज्येष्ठ शिक्षिका सौ.एम.डी.फुल्लारी, प्रभाकरराव पाटील आढाव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


# ओव्या दिनांच्या मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे होणार प्रकाशित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

कवी आणि कथाकार सुधीर शेरे यांचा स्थानिक, राज्य , राष्ट्रीय आणि जागतिक दिन विशेषांवर अधारित ओव्या दिनांच्या हा कविता संग्रह मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे आज दि. ३१ मार्च रोजी प्रकाशित होत आहे. सुधीर शेरे यांचा वेस कविता संग्रह आणि एक होती गंगा हा कथासंग्रह या पूर्वी प्रकाशित झाले आहेत.

विविध शैक्षणिक व सामाजिक संस्था, पालक , शिक्षक आणि विद्यार्थी यांना शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य विषयक, विज्ञान विषयक, उद्योग विषयक ,विविध




सेवा विषयक,पर्यावरण विषयक विशेषतः युनेस्कोने घोषित केलेल्या दिन विशेषांवर अधारित अष्टाक्षरी रचना असलेल्या ओव्यांच्या स्वरुपात असणारी माहिती काव्यरुपात असल्याने उपयुक्त ठरणार आहे.

बहुजन साहित्य संघ , चिखली आयोजित सहावे राज्यस्तरीय साहित्य संमेलन सिंदखेड राजा येथे ३१ मार्च रोजी संपन्न होत आहे. संमेलन अध्यक्ष डॉ. गणेश गायकवाड, उद्घाटक केंद्रिय आयुष मंत्री मा. नामदार प्रतापराव जाधव, प्रमुख अतिथी मा. आमदार मनोज कायंदे आणि साहित्यिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे.

# किनवट तालुक्यातील जि.प्रा.शाळा मुळझरा येथील मुख्याध्यापक श्री मारोती चिंतलवाड सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । दशरथ आंबेकर**

किनवट तालुक्यातील मौजे मुळझरा येथील जि.प्रा.शाळा मुळझरा येथील मुख्याध्यापक श्री मारोती संभाजी चिंतलवाड सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न. दि ३०/०३/२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे गावकऱ्यांच्या वतीने संकुल भिसी केंद्रअंतर्गतच्या शिक्षकांच्या वतीने दि२८/०३/२०२५ रोजी ५८ वर्ष सेवानिवृत्ती झाल्यामुळे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



चिंतलवाड सर यांचे शैक्षणिक कार्य पाहता त्यांनी जनगणना सर्वेक्षण, मतदान कार्य केंद्राध्यक्ष, मतदार नोंदणी बीएलओ, वृक्षारोपण संगोपन, गाव सर्वेक्षण असे विविध कार्य केले आहेत.असे म्हणतात शिक्षक हा सर्व गुण संपन्न असायला पाहिजे त्या म्हणीप्रमाणे मुळझरा येथील मुख्याध्यापक श्री मारोती संभाजी चिंतलवाड यांनी या उक्तीला सत्यात उतरवले आहे. चिंतलवाड सर यांना वाचन,लेखन,समाजकार्य करण्यात आवड होती दरम्यान त्यांनी चित्र काढणे, कविता करणे, योगा करणे अशा प्रकारचे विविध छंदही जोपासले. तीन अंकी नाटकातही त्यांनी खलनायकाची भूमिका केली. अनेक भजन स्पर्धेत सहभागी होते. तसेच काही सामाजिक लग्न विवाह मेळावे केले त्यांनी परिवारामध्ये तीन मुली, त्यामध्ये एक विवाहित मुलगी, एक मुलगा, आई वडील आहेत.

सौ. मंगल चिंतलवाड मॅडम (लाईफस्टाईल फिटनेस सेंटर नांदेड ) यांनी चिंतलवाड सर यांच्या कार्याविषयी गुणगौरव भाषण केले प्रियंका चिंतलवाड ह्या मुलींनी सुद्धा वडिलां विषयी मनोगत व्यक्त केले आहे .या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे अध्यक्ष केशव मेकाले सर (विस्तार अधिकारी इस्लापूर तसेच पंचायत समिती हिमायतनगर गटशिक्षण अधिकारी) होते. तसेच शंकर वारकड सर (केंद्रप्रमुख भिसी,) शिवाजी राठोड सर, मु.अ.भिसी, तसेच केंद्रांतर्गत असलेले तसेच नांदेडचे शिक्षक देविदास गवाले सर जाधव सर यांनी नांदेड राहत्या घरी त्यांना शुभेच्छा दिल्याउपस्थित होत्या. ज्ञानदीप कोचिंग क्लासेसचे संचालक तथा दैनिक अर्थ चे संपादक व रिपब्लिक २४ न्युज चे मुख्य संपादक डि.एन.गुंडेकर सर, व लोकशाही पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा युवा पत्रकार संघटनेचे सचिव, तसेच चिंतलवाड सरांचे बंधू राम संभाजी चिंतलवाड तसेच गावातील पालकासह गावकरी मंडळी उपस्थित होती.

# जिंदाल स्टेनलेस महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटींची गुंतवणूक करणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

जिंदाल स्टेनलेस लिमिटेड महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प उभा करणार आहे. यातून सुमारे साडे पंधरा हजार रोजगार संधी उपलब्ध होणार असल्याने, या प्रकल्पाचे महाराष्ट्रात स्वागत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



जिंदाल स्टेनलेस लिमिटेडचे अध्यक्ष रतन जिंदाल यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची 'सागर' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत श्री. जिंदाल यांनी या प्रकल्पाच्या उभारणीचा प्रस्ताव सादर केला. या प्रकल्पाची उत्पादन क्षमता वार्षिक चार दशलक्ष टन इतकी असणार आहे.या उद्योग समुहाने आणि श्री. जिंदाल यांनी महाराष्ट्राच्या क्षमतेवर दाखविलेला विश्वास महत्वाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पाकरिता सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेत नमूद केले.याप्रसंगी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, जिंदाल समुहाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

# दोन गावठी कट्टे व दोन जिवंत काढतुस लातूर मधून जप्त LCB ची दमदार कामगिरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आगामी सन उत्सव च्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून कार्यवाही करण्यात येत होती. पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीचे विश्लेषण करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न होताच दिनांक २९/०३/२०२५ रोजी गांधी मार्केट परिसरातून एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन त्याच्याकडून दोन गावठी कट्टे (पिस्टल) हस्तगत करण्यात आले आहे.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर

१) १७ वर्षीय विधी संघर्ष बालक, राहणार मांजरी, तालुका जिल्हा लातूर, सध्या राहणार गोकुळ नगर पठार, वारजे माळवाडी, पुणे

२) व्यंकटेश उर्फ विकी शिवशंकर अनपुरे, राहणार सहयोग नगर, दत्त मंदिराजवळ, गोकुळ पठार, वारजे माळवाडी, पुणे.(फरार)

असे असून विधी संघर्ष बालकाकडून दोन गावठी कट्टे व दोन जिवंत काढतूस जप्त करण्यात आले.याप्रकरणी पोलीस ठाणे गांधी चौक येथे गु.र.न. १३५/२०२५ कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला असून पुढील तपास गांधी चौक पोलिस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. फरार आरोपीचा शोध सुरू आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अतिशय उत्कृष्टरित्या गोपनीय माहितीचे संकलन व विश्लेषण करून करून गावठी कट्टे बाळगणाऱ्या अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे.सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस अंमलदार नवनाथ हासबे,माधव बिलपटे , तुराब पठाण, पाराजी पुट्टेवाड,युवराज गिरी, राजेश कचे, प्रदीप स्वामी, मोहन सुरवसे, नकुल पाटील यांनी केली आहे.

# आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते पाच एसटी बसचे लोकार्पण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

तीर्थक्षेत्र असलेल्या माहूर आगरासाठी किनवट- माहुर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे परीवहण मंत्री यांच्या कडे किनवट व माहुर अगारासाठी नविन बससेची मागणी केली होती ती मागणी मान्य केल्याने माहुर अगारासाठी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर पाच बसेस मिळाल्या त्या बसचे आ.भीमराव केराम यांनी माहूर ते दत्तशिखर असे सात किलोमीटर प्रवास करून लोकार्पण केले यावेळी बस उपलब्ध करून दिल्याने आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि परिवहन मंत्र्यांचे आभार मानले



तिर्थक्षेत्र असलेल्या माहुर आगाराच्या बसेसची अवस्था दयनीय झाली असल्याने बसेस सतत नादुरुस्त होत असल्याने त्या प्रवाशांच्या सेवेत वेळेत उपलब्ध होण्यासाठी विलंब होत होता यांचा प्रवासी व साडेतीन शक्तीपीठापैकी एक मूळ शक्तिपीठ असलेल्या रेणुका माता भगवान दत्तप्रभू माता अनुसया यांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मनस्ताप सहन करावा लागत होता त्यामुळे भाविकांना महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळ कडून दर्जेदार सुविधा आणि नवीन बसेस मिळाव्या म्हणून किनवट माहुर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माहूर व किनवट या दुर्गम भागात नवीन बसेसची मागणी लावून धरली होती सततच्या

पाठपुराव्यामुळे राज्यसरकारने नांदेड जिल्ह्यात माहुर अगारास नविन कोर्या बसचा पुरवठा केल्याने त्यांचे दि ३० रोजी

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर आ.भीमराव केराम यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले यावेळीआ. भीमराव केराम यांनी या बस मधुन दतशिखर पर्यंत चा प्रवास केला यावेळी बसमध्ये त्यांच्या समवेत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक तथा नगरसेवक प्रा. राजेंद्र केशवे,माजी जि.प. सदस्य संजय राठोड,नगराध्यक्ष फिरोज दोसानी, नगरसेवक गोपू भाऊ महामुने, भाजपा चे जेष्ठ नेते अनिल वाघमारे,विजयी आमले,नंदकुमार जोशी सौ.पद्मा गिन्हे,सौ अर्चना दराडे,सौ.राधाताई उपलेंचवार,स्वाती आडे,किशोर जगत ,तालुकाध्यक्ष कांताराव घोडेकर,दत्तात्रय शेरेकर,संदीप राठोड,विनोद सूर्यवंशी,अपिल बेलखोडे यासह पत्रकार बांधव व एस टी महामंडळाचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904